# रे.दि.मु.नं.८१/२०१५ मधील नि.५ खालील आदेश

*(उत्तम पाटील विरुध्द शरद पाटील वगैरे)*

(१). वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी नं.१ ते ७ विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

(२). वादींतर्फे श्री.एस.बी.सुहासे वकील, प्रतिवादी नं.१ ते ३ तर्फे श्री.बी.पी.शिंदे वकील व प्रतिवादी नं.४ ते ७ तर्फे श्री.एन.एम.पाटील वकील यांचा युक्तिवाद ऐकला. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का ? | .... **नाही** |
| २. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर झाल्यास, वादीचे कशानेही न भरुन येणार असे नुकसान होईल, असे वादीने शाबीत केले आहे का ? | .... **नाही** |
| ३. न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | .... **नाही** |
| ४. काय आदेश ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो** |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक १ ते ३ साठीः–

(३). मौजे पलुस पैकी सांडगेवाडी येथील मिळकत क्र.२९२ क्षेत्र ० हेक्टर १० आर पो.ख.०.०१ (येथुन पुढे सोयीसाठी "**दावा मिळकत**" असे संबोधले आहे) ही मुळची परांजपे कुटूंबियांची होती. दि.०८.१२.१९४९ रोजी श्री भाऊ भिवा सांडगे यांनी ती परांजपे यांचेकडुन नोंद खरेदीदस्त १६७९/१९४९ ने खरेदी केली होती. फेरफार नं.१०७१७ ने दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी दि.११.०८.१९५० रोजी भाऊ सांडगे यांच्या नावाची नोंद झाली. दि.२४.११.१९८८ रोजी नोंद खरेदी दस्त क्र.४१७८/१९८८ ने वादीने दावा मिळकत खरेदी घेतली. तेंव्हापासुन आजतागायत दावा मिळकतीवर वादीचा कब्जा आहे. असे असताना प्रतिवादी नं. १ याने बोगस कागदपत्रांआधारे त्यांचे वडील शहाजी पाटील यांच्या नांवे खोटे खरेदीपत्र तयार केले आहे. वादी यांनी अशाप्रकारचा कोणताही कागद प्रतिवादी नं.१ यांचे वडिल शहाजी पाटील यांना करुन दिला नाही. दावा मिळकतीबाबत मे.उपविभागीय अधिकारी, खानापुर यांच्या कोर्टात आर.टी.एस.९९८/२०११ हे प्रतिवादी नं.१ यांचे वडिलांनी दाखल केले व सदर निकाल त्यांच्या बाजुने झाला. त्याविरुध्द वादीने अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे आरटीएस ३३/२०१३ हे दाखल केले. सदर आरटीएसचा निकाल वादीच्या बाजुने झाला. त्या निकालाविरुध्द प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या प्रकरणामध्ये मे.अप्पर आयुक्त, पुणे यांनी प्रतिवादी नं.१ यांच्या बाजुने निकाल दिला. सदर निकालाच्या आधारे प्रतिवादी नं.१ ते ७ दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी आपल्या नावाची नोंद करतील व बेकायदेशीर कृत्य करतील म्हणुन वादीने प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकिदीसाठी अर्ज दिला आहे.

(४). प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी नि.३३ येथे कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे दिले आहे. त्यांच्या कथनानुसार वादी व परांजपे यांनी दावा मिळकतीचे दि.१३.०९.२००१ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्र करुन दिलेले आहे. तेंव्हापासुन दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कब्जा आहे. दावा मिळकतीमधील वादीच्या दि.२४.११.१९८८ च्या खरेदीपत्रापासुन कब्जे वहिवाटीस व मालकी हक्कास हरकत करु नये अशा करीता वादीने प्रस्तुत दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे. परंतु वादीने दि.१३.०९.२००१ रोजीचे खरेदीपत्र रद्द होऊन मागितले नाही अथवा त्याबाबत दाव्यामध्ये कोणतेही कथन केलेले नाही. वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज व दावा चालणेस पात्र नाही. वादीने दि.१३.०९.२००१ रोजीच्या खरेदीपत्राविरुध्द मुदतीत दाद मागितलेली नाही अथवा सदर खरेदीपत्र कोणत्याही न्यायालयात आव्हानित केले नाही. सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी केली आहे.

(५). प्रतिवादी नं.४ ते ६ यांनी नि.३५ येथे दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे दिले आहे. त्यांनी वादीचा दावा व तुर्तातुर्त अर्जामधील कथने नाकारली आहेत. प्रस्तुत प्रतिवादी नं.४ ते ६ यांना का पक्षकार केले आहे त्याबद्दल कोणतेही संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे. प्रतिवादी नं.४ ते ६ यांनी दाखल केलेली कैफियत व म्हणणे प्रतिवादी नं.७ यांचेसाठी वाचणेबाबतची पुरसिस नि.३९ कडे दाखल केली आहे.

(६). प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी दि.२४.११.१९८८ च्या खरेदीपत्राने दावा मिळकतीवर वादीची मालकी होती ही बाब मान्य केली आहे. परंतु वादीने व परांजपे यांनी प्रतिवादीचे पुर्वाधिकारी शहाजी नारायण पाटील यांना दि.१३.०९.२००१ रोजीचे खरेदीपत्र व दि.१०.१०.२००१ रोजीचा चुक

दुरुस्ती लेख या दोन नोंदणीकृत पत्राने दावा मिळकत तबदिल केली आहे. त्यामुळे दावा मिळकतीवर वादींचा कब्जा नाही.

(७). प्रस्तुत कामी दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे हे दर्शवण्यासाठी वादीने दावा मिळकतीचे ७/१२ उतारे (नि.४५ ते ४७) हजर केले आहेत. वादीने दाखल केलेल्या आरटीएस/रिव्हीजन/सांगली १६६/२०१४ मधील अप्पर आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचे निकालाचे अवलोकन करता सदरचा निकाल प्रतिवादी यांच्या बाजुने लागल्याचे दिसुन येते. सदर निकालाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, उपविभागीय अधिकारी, खानापुर यांनी आरटीएस/रिव्हीजन ९९८/२०११ मधील दि.२८.१२.२०१२ ने फेरफार नं.१००१ हा मंजुर केल्याचा आदेश पुणे येथील विभागीय अधिकारी यांनी वैध ठरवला.

(८). दाव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी हे दि.१३.०९.२००१ पासुन वादीचे मालकी हक्कास हरकत अडथळा करीत आहेत असे वादीने दाव्यात नमुद केले आहे. त्यानंतर वादीने प्रस्तुतचा दावा वादीची दि.२४.११.१९८८ च्या खरेदीपत्राने मालकी वहिवाट आहे असे जाहीर होऊन मिळणेसाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे.

(९). वादीतर्फे वकिलांनी प्रस्तुत कामी दि.१३.०९.२००१ रोजीचे खरेदीपत्रावरील लिहुन देणार गणेश परांजपे व शंकर परांजपे हे अनुक्रमे २७.१२.१९५२ व २१.०४.१९५७ रोजी मयत झाले असल्यामुळे ते दि.१३.०९.२००१ रोजी हयात असणे शक्य नाही असे नमुद करुन प्रतिवादी क्र.१ चे पुर्वहक्कदार शहाजी पाटील यांचे दि.१३.०९.२००१ रोजीचे खरेदीपत्र बनावट असल्याचे नमुद केले आहे. वादीने त्याकरीता वर नमुद गणेश व शंकर परांजपे यांचे मृत्युचे दाखले हजर केलेले आहेत. प्रतिवादीतर्फे वकिलांनी असे नमुद केले की, वादीने दाव्यासोबत हजर केलेले वर नमुद दोन्ही व्यक्तींचे मृत्युचे

दाखले (छायांकीत प्रती नि.३/१८ व ३/१९) व वादीने नि.१४ व नि.१५ येथील वर नमुद व्यक्तींचे मृत्युचे दाखले याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, नि.१४ व नि.१५ वरील दाखल्यांमध्ये नोंदणीची तारीख नमुद आहे परंतु नि.३/१८ व ३/१९ येथे हजर केलेल्या दाखल्यांच्या छायांकीत प्रतीमध्ये नोंदणीची तारीख दिसुन येत नाही. यावरुन वर नमुद मृत्यु दाखल्यांच्या नोंदीच्या सत्यतेबाबत सकृतदर्शनी शंका उपस्थित होते. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने दि.१३.०९.२००१ रोजीचे खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेसाठी दावा दाखल केलेला नाही.

(१०). वादीने दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.८ व ९ यांचेकडुन कर्ज घेतले हे दर्शवण्यासाठी फेरफार नं.१६९१ व फेरफार नं.१६२७ (अनुक्रमे नि.५४ व नि.५५) च्या छायांकीत प्रती हजर केल्या आहेत. सदर फेरफारांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने प्रतिज्ञापत्र दिल्यावरुन सदर फेरफारांची नोंद गट नं.२८९ व २९२ बाबत घालण्यात आलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये काय मजकुर नमुद होता व आहे ही बाब वादीने दाव्यामध्ये नमुद करणे आवश्यक होते किंवा सदर प्रतिज्ञापत्राच्या प्रती या कामी हजर करणे आवश्यक होते असे प्रतिवादीतर्फे वकिलांनी नमुद केले व असे कथन केले की सदर फेरफारावरुन दावा मिळकतीवर वादीचा कब्जा आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत कामी वादीने सदरचे प्रतिज्ञापत्र या कामी हजर केलेले नाही. त्यामुळे केवळ सदर फेरफारांवरुन दावा मिळकतीवर वादीचा कब्जा आहे असे म्हणणे न्यायाचे होणार नाही.

(११). प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी गट नं.२८९ चा गट नकाशा हजर केला आहे. त्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा मिळकत सदर मिळकतीच्या पुर्व दक्षिण कोप–यात आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१ चे पुर्वहक्कदार शहाजी पाटील व वादी आणि इतर यांच्यामध्ये

दि.२४.०९.२००४ रोजी झालेले नोंदणीकृत वाटणीपत्र हजर केलेले आहे. सदर वाटणीपत्रामध्ये गट नं.२८९ मधील वाटपाबाबतचा नकाशा व वाटणीपत्रातील मजकुराचे अवलोकन करता असे दिसुन येते की, गट नं.२८९ मधील उत्तर बाजुमध्ये उत्तम नारायण पाटील यांच्या वाटणीचे ३० गुंठे क्षेत्र आहे व त्याचे दक्षिण बाजुस शहाजी नारायण पाटील यांच्या वाटणीचे ५१ गुंठे क्षेत्र आहे. सदर क्षेत्राच्या दक्षिणेस पुन्हा शहाजी पाटील यांचे क्षेत्र आहे. गट नं.२८९ चा नि.४२ कडील नकाशा, वादी–प्रतिवादी व इतर यांचे दरम्यान झालेले वाटपपत्र याचे एकत्रित अवलोकन करता असे दिसुन येते की, गट नं. २९२ मध्ये प्रतिवादी नं.१ चे पुर्वहक्कदार म्हणजेच शहाजी पाटील यांची कब्जे वहिवाट होती. सबब प्रस्तुत कामी दावा मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे हे सकृतदर्शनी शाबीत होत नाही.

(१२). प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१ यांचे पुर्वहक्कदार शहाजी पाटील यांनी वादी व परांजपे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीपत्राने दावा मिळकतीचा कब्जा घेतलेला आहे व उपविभागीय अधिकारी, खानापुर यांनी आरटीएस/रिव्हीजन ९९८/२०११ मधील दि.२८.१२.२०१२ ने फेरफार नं.१००१ हा मंजुर केल्याचा आदेश पुणे येथील विभागीय आयुक्त यांनी आरटीएस/रिव्हीजन/सांगली १६६/२०१४ मध्ये दि.०४.०८.२०१५ च्या आदेशाने वैध ठरवला आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.१ ते ३ यांचा कब्जा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. वादीने दाव्यामध्येच प्रतिवादी सन २००१ पासुन हरकत अडथळा करत असल्याचे नमुद केले आहे. परंतु वादी यांनी प्रस्तुतचा दावा पुणे येथील आरटीएस रिव्हीजन/सांगली १६६/२०१४ मधील निर्णय वादींच्या उलट लागल्यानंतर प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसुन येते.

(१३). तुर्तातुर्त मनाई देणेबाबतचा अधिकार हा न्यायालयाचा

विवेकाधिकार आहे व तो मिळणेसाठी तुर्तातुर्त मनाई मागणा–या पक्षकाराने स्वच्छ हाताने दाव्याबाबत संपुर्ण माहिती अभिलेखावर आणणे व सदर पक्षकाराने दाव्याबाबत योग्य तत्परता किंवा खबरदारी (due diligence) दाखवणे आवश्यक असते. प्रस्तुत कामी वादीने दाव्यामध्ये वादी व प्रतिवादीचे पुर्वहक्कदार म्हणजेच शहाजी पाटील यांचेमध्ये झालेल्या वाटणीपत्राबाबत व त्यामध्ये दर्शवलेल्या चतुःसिमेबाबत वस्तुस्थिती अभिलेखावर आणलेली नाही. त्याचप्रमाणे सौ.द्वारकाबाई विश्वनाथ खोत यांनी शहाजी पाटील यांचे वारस म्हणजेच शरद पाटील, विद्या पाटील, सुप्रिया पाटील, स्मीता पाटील, सुरज पाटील यांना दिलेले दावा मिळकतीबाबतचे नोंदणीकृत समतीपत्र याचा उल्लेख वादी यांनी दाव्यात केलेला नाही. या सर्व बाबींवरुन असे दिसुन येते की, वादी हा स्वच्छ हाताने आलेला नाही व दावा दाखल करताना तत्परता दाखवलेली नाही. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजुर केल्यास वादीऐवजी प्रतिवादी यांचे नुकसान होईल. त्याचबरोबर दाव्याचे समतोलत्वदेखील वादीऐवजी प्रतिवादी यांच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. सबब मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ साठीः–**

(१४). वर नमुद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवले आहेत. सबब मुद्दा क्र.४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/xx

पलुस. (एस.एस.पाटील)

दिनांक–०३.११.२०१५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलुस.